प्रेस नोट

**रेल्वे महीला प्रवाशांच्या पर्स चोरणा-या आरोपीस गुन्हे शाखा, लोहमार्ग पुणे पथकाने जेरबंद करून त्यांचेकडून 8,98,200 रू. किंमतीचा माल हस्तगत केला.**

दि. 07/07/2018 रोजी फिर्यादी नामे सिध्दार्थ कांतीलाल भंडारी हे त्यांचे कुटुंबासह गाडी क्र. 16209 अजमेर मैसुर एक्सप्रेस गाडीचे बोगी नं. ए/1, बर्थ क्र. 1,2,3,4 वरून फालना ते बेलगम असा प्रवास करीत असताना सदरची गाडी पुणे रेल्वे स्टेशन येथे आली असता त्यांच्या पत्नीच्या डोक्या जवळ ठेवलेली लेडीज पर्स आतील सोन्याचे दागिने, मोबाईल व रोख रक्कमेसह कोणीतरी चोरटयाने मुद्दाम लबाडीने चोरून नेली होती. याबाबत पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे येथे गु.र.नं. 756/2018 कलम 379 भा.द.वी. प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत असताना संशयीत आरोपीचे सी.सी.टी.व्ही. मिळाल्याने स्था.गु.शा. लोहमार्ग पुणे स्टाफ व आर.पी.एफ. स्टाफ संयुक्तपणे आरोपीचा शोध घेत होते.

तसेच दि. 02/09/2018 रोजी फिर्यादी नामे रेखा ललीत भंडारी या गाडी क्र. 16507 जोधपुर बॅगलोर एक्सप्रेस गाडीचे बोगी नं. ए/1 बर्थ नं. 3 वरून झोपुन प्रवास करीत असताना पुणे रेल्वे स्टेशन येण्यापुर्वी 01.30 ते 03.45 वा.च्या दरम्यान त्यांची पर्स आतील दागिने व मोबाईलसह चोरून नेली. त्याबाबत फिर्यादी हया मिरज लोहमार्ग पोलीस ठाणे येथे दिल्याने पुणे लोह.पो.ठाणे गु.र.नं. 943/2018 कलम 379 भा.द.वी. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.

स्थानिक गुन्हे शाखा लोहमार्ग पुणेकडील सहा. पो.निरीक्षक जगताप यांनी आरोपीचे सी. सी.टि.व्ही. फुटेज खास बातमीदारांना दाखवील्याने दि. 02/09/2018 रोजी त्यांना प्राप्त झालेल्या खबरीवरून स्थानिक गुन्हे शाखा स्टाफ व आर.पी.एफ. स्टाफच्या मदतीने आरोपी नामे अल्ला बकश महम्मद इस्माईल, वय 19 वर्षे, राह. घर नं. टी–5–977/5बी, टिपु चौक, इद्दुला कॉलनी, दर्गा रोड, छोटा रोजा, पाशापुरा, गुलबर्गा यास शिताफीने पकडून त्याचेकडे पुणे लोह. पो.ठाणे गु.र.नं. 943/2018 कलम 379 भा.द.वी. मधील गेले मालातील लेडीज पर्स आतील दागिने, मोबाईल फोन व रोख रक्कमेसह एकुण 5,14,200/– रू. किंमतीचा एवज मिळून आला. आरोपीने अटकेत असताना त्याचे गुलबर्गा कर्नाटक येथील घरातुन पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे गु.र.नं. 756/2018 कलम 379 भा.द.वी. या गुन्हयातील 3,84,000/– रू. किंमतीचे सोन्याचे दागिने व घडयाळ काढून दिले. असा दोन्ही गुन्हयात आरोपीकडून एकुण **8,98,200/–** रू. किंमतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे. यातील अटक आरोपी हा वाडी लोहमार्ग पोलीस ठाणे राज्य–कर्नाटक येथील रेकॉर्डवरील आहे. सदर आरोपीची दि. 12/09/2018 रोजी पर्यंत पोलीस कोठडी मंजुर असून अधिक तपास चालु आहे.

सदरची कामगीरी मा. पोलीस अधिक्षक श्री दिपक साकोरे सो, मा. अप्पर पोलीस अधिक्षक तुषार पाटील सो, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अनिल दबडे, स्थानिक गुन्हे शाखा, लोहमार्ग पुणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश जगताप, पोलीस हवालदार धनंजय दुगाने, पोलीस नाईक सुनिल कदम, आनंद कांबळे, सुधाकर जगताप, पोलीस शिपाई दिनेश बोरनारे, विक्रम मधे, स्वप्नील कुंजीर तसेच आर.पी.एफ.पुणे येथील आय.पी.एफ. सुनिल चाटे, उप–निरी. विजय पाल सिंग, सहा.उप–निरी. एच.आर. खोकर, शिपाई विशाल माने व युवराज गायकवाड या पथकाने केली आहे.